**राज्यातील ग्रामपंचायतींचे आयएसओ प्रमाणिकरण (ISO ९००१ : २०१५) करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आयएसओ २०१८/प्र.क्र.०१/आसक**
बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ.
फोर्ट,मुंबई-४००००१
तारीख: १८ सप्टेंबर,२०१९

**प्रस्तावना :-**

मागील काही वर्षात ICT च्या माध्यमातून प्रशासकिय कार्यपद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल घडून येत आहेत. शासन व्यवहारामध्ये जास्तीत जास्त पारदर्शकता व शासन व्यवहार जलद गतीने होण्यासाठी ई-गव्हर्नन्सचा वापर केला जात आहे. या माध्यमाचा वापर शासनाच्या G२G, G२B, G२C सेवा देण्यासाठी प्रभावीपणे करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार पंचायतीराज संस्थांच्या कारभारामध्ये अभिप्रेत असलेली एकसूत्रता व पारदर्शकता आणणे, नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक असलेले सेवा-दाखले त्यांच्या रहिवासी क्षेत्रात कालबद्ध स्वरूपात मिळणे यासाठी ई-पंचायत हा Digital Mission Mode प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत केंद्र शासनाने NIC च्या माध्यमातून PRIASoft, PFMS, GPDP, Plan Plus यासारख्या विविध प्रकारच्या आज्ञावली विकसीत केल्या आहेत. नविन तंत्रज्ञानाचा वापर करतांना ग्रामपंचायतीच्या कामकाजामध्ये मुलभूत बदल घडून येत आहेत. Digital India Mission प्रमाणे देयक संगणक प्रणाली (Payment system), नागरिकांसोबत प्रत्यक्ष संवाद कार्यपद्धत (Front end व Interaction process) यामध्ये मोठा बदल होत आहे. ग्रामपंचायतीमधील विविध रजिस्टर्स, फॉर्मस्, दस्तावेज यांचे संगणकीकरण करून पेपरलेस ग्रामपंचायतीकडे वाटचाल सुरू आहे. बदलत्या परिस्थीतीत ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीचे (Methodology and process) देखील पुनर्विलोकन करून व्यवसाय प्रक्रिया पुनर्निर्मिती (Business Process Re-engineering) करण्याची आवश्यकता आहे. जुन्या कार्यपद्धतीमधील काही रजिस्टर्स, दाखले, फॉर्म्स, यामध्ये बदल झालेले आहेत तर काही कालबाह्य झाले आहेत. सुधारीत कार्यपद्धतीमध्ये यात बदल/पुनर्निर्माण करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी साध्य करण्यासाठी व ग्रामपंचायतींच्या सुधारीत कार्यपद्धतीसाठी गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली दस्तावेज (QMS - Quality Management System Document) तयार करून, ज्याद्वारे सर्व ग्रामपंचायतींमध्ये एकसुत्रता निर्माण होईल, राबविल्यास व ग्रामपंचायतींचे ISO

प्रमाणीकरण करून घेतल्यास ग्रामपंचायतीच्या कामकाजाचे तटस्थ संस्थेमार्फत परिक्षण होईल. अशाप्रकारे ISO प्रमाणिकरण करुन घेतल्यास त्याआधारे सर्व नवीन कार्यपद्धती योग्य गुणवत्तेची असल्याची शासनाला खात्री होईल.

याद्वारे ग्रामपंचायतीमधील अधिकारी/कर्मचारी यांच्या कामाच्या दर्जामध्ये वाढ करण्यासाठी त्यांना योग्य प्रकारे प्रशिक्षण देणे तसेच त्यांच्या कामाचे प्रमाणीकरण करणे तसेच प्रशासनात अधिक पारदर्शकता, लोकाभिमुखता व संवेदनशीलता आणणे यासाठी आंतरराष्ट्रीय मानक संस्थेद्वारे निश्चित केलेल्या मानकांनुसार राज्यातील ग्रामपंचायतींची मांडणी करण्यासाठी राज्यस्तरावर एक मानांकित गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली दस्तावेज (QMS - Quality Management System Document) प्रमाणे कार्यपद्धती अंमलात आणून त्याआधारे राज्यातील ग्रामपंचायतींचे ISO प्रमाणीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे-

**शासन निर्णय :-**

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासकीय कामकाज कार्यक्षम व्हावे आणि त्यांच्या कार्यपध्दतीमध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी ग्रामपंचायतींचे आयएसओ प्रमाणिकरण (ISO ९००१ : २०१५) करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

२. राज्यातील सर्व ग्रामपंचायतींचे आयएसओ प्रमाणिकरण करण्याचे प्रस्तावित आहे. ग्रामपंचायतींचे आयएसओ प्रमाणिकरण करण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर निविदा प्रक्रीयेद्वारे एस-२ इंफोटेक इंटरनॅशनल लि. या एजन्सीची निवड करण्यात आलेली आहे. सदर संस्थेने टप्पा-१ मधील गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली दस्तावेज (QMS - Quality Management System Document) तयार करून त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली दस्तावेज (QMS - Quality Management System Document) मधील मार्गदर्शक सुचना सर्व ग्रामपंचायतींना लागू राहतील. सर्व ग्रामपंचायतींनी आयएसओ प्रमाणिकरण करणे गरजेचे असून ग्रामपंचायतींनी शासनाने निश्चित केलेल्या संस्थेकडून किंवा त्याव्यतिरिक्त स्थानिक पातळीवर कमी दराने सेवा देणाऱ्या सक्षम संस्थेकडून (उदा.ज्या संस्थांनी किमान ५ सरकारी संस्थेसाठी ISO सल्लागार किंवा मनुष्यबळाचा पुरवठा केलेला आहे किंवा त्या संस्थांकडे योग्य व सक्षम मनुष्यबळ उपलब्ध आहे अशा संस्था याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी आपल्या जिल्ह्यासाठी किमान पात्रता निर्धारित करू शकतील.) या शासन निर्णयात खाली नमुद केलेल्या टप्पा-२ व ३ बाबतची कार्यवाही, मान्य झालेल्या गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली दस्तावेज (QMS - Quality Management System Document) च्या आधारे करणे आवश्यक आहे. तसेच ज्या ग्रामपंचायतींनी या पुर्वी ISO प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले आहे त्यांनी सदर प्रमाणपत्र नुतनीकरण करून घेते वेळी त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये उपरोक्त गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली दस्तावेज (QMS - Quality Management System Document) नुसार आवश्यक

ते बदल करून घेण्यात यावेत व हे करताना शासनाद्वारे निश्चित केलेल्या संस्थेकडून किंवा वरील नमुद केल्या प्रमाणे सक्षम संस्थेकडून सेवा घ्यावी.

३. ग्रामपंचायतींचे आयएसओ प्रमाणिकरण करण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

**टप्पा-१- BPR (Business Process Reengineering) Services :**

१) BPR Services साठी निवड करण्यात आलेली एजन्सी खालीलप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करून देईल.

| पद | अनुभव | शैक्षणिक पात्रता | मनुष्यबळ |
|---|---|---|---|
| प्रिंसिपल कन्सल्टंट | >१५ वर्ष | कोणत्याही शाखेतील पदवीधर (एमबीए पात्रता धारकास प्राधान्य) | २ |
| मॅनेजिंग कन्सल्टंट | >८ ते <=१५ वर्ष | कोणत्याही शाखेतील पदवीधर (एमबीए पात्रता धारकास प्राधान्य) | ८ |
| सिनिअर कन्सल्टंट | >५ ते <=८ वर्ष | कोणत्याही शाखेतील पदवीधर | ६ |

२) ग्रामपंचायतीकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि प्रचलीत कार्यपद्धतीचा अभ्यास करून त्याआधारे AS-IS अहवाल सहा आठवडयाच्या आत तयार करेल आणि विहित कालावधीत या प्रयोजनार्थ स्थापन करण्यात आलेल्या समितीपुढे सादर करेल.

३) सदर AS-IS अहवालास मान्यता देण्यासाठी संबंधित विभागाच्या उप आयुक्त (विकास) यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय समित्या स्थापन करण्यात येतील. सदर समितीमध्ये त्या विभागातील सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांचा समावेश असेल.

४) AS-IS अहवालानुसार ग्रामपंचायतीच्या प्रचलीत कार्यपद्धतीमध्ये निदर्शनास आलेल्या त्रूटी, कार्यपद्धतीमधील अनावश्यक द्विरूक्त्या, प्रशासकीय मान्यतेचे टप्पे कमी करणे. तसेच कार्यपद्धती अधिक जलद गतीने व्हावी यासाठी ICT चा वापर करून ग्रामपंचायतीस कागद विरहीत कामकाज करण्यास सक्षम करणे. प्रचलित संगणक प्रणालींचा आढावा घेऊन केंद्र शासनाच्या PRIASoft, PFMS इ. प्रणालींशी सुसंगत करण्याच्या उपाययोजना सुचविणे. यासाठी ISO ९००१ : २०१५ या आंतरराष्ट्रीय मानकांच्या आधारे TO-BE अहवाल आठ आठवडयांत तयार करेल. सदर अहवाल उपरोक्त विभागीय समितीपुढे सादर करण्यात येईल.

५) विभागीय समितीने केलेल्या सुधारणा/ शिफारशींच्या आधारे गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली दस्तावेज (QMS - Quality Management System Document) बारा आठवडयांत तयार करण्यात येईल.

६) सदर गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली दस्तावेज (QMS - Quality Management System Document) या प्रयोजनार्थ स्थापन करण्यात आलेल्या राज्य स्तरीय समितीपुढे सादर करण्यात येईल.

७) राज्यस्तरीय समिती पुढील प्रमाणे राहिल :

१. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान- अध्यक्ष
२. उप आयुक्त (विकास), सर्व विभाग- सदस्य
३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद ,पुणे - सदस्य सचिव

८) समितीने केलेल्या शिफारशींसह अहवाल अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात येईल.

**टप्पा-२- अंमलबजावणी व प्रमाणीकरण**

१) ग्रामपंचायतींचे आयएसओ प्रमाणिकरण करण्यासाठी शासन स्तरावर मान्य झालेल्या गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली दस्तावेज (QMS - Quality Management System Document) नुसार आवश्यक ते बदल करणे व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणाकरिता ग्रामपंचायतीने संबंधित जिल्हा परिषद व राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे यांचेमार्फत शासनाकडे नोंदणी करावी व सदरचे काम शासन स्तरावर निविदा प्रक्रियेद्वारे निश्चित झालेल्या सल्लागार संस्थेकडून करावे किंवा स्थानिक पातळीवरील दर्जेदार संस्थेकडून करुन घ्यावे याबाबतचा पर्याय निवडावा.
२) निविदा प्रक्रियेद्वारे निश्चित झालेली सल्लागार संस्था सेवेसाठी निवडल्यास रक्कम रू. ३३,०००/- अधिक १८% जीएसटी इतकी रक्कम ग्रामपंचायतीने राज्यस्तरावरील राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान यांच्या खात्यात जमा करावी. तसेच तीन वर्षासाठी करण्यात येणाऱ्या सर्विलन्स ऑडिटसाठी प्रति ग्रामपंचायत रू. २१,०००/- खालील प्रमाणे राज्यस्तरावरील राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान यांच्या खात्यात जमा करावी.

| सर्विलन्स ऑडिटसाठी प्रति ग्रामपंचायत प्रति वर्ष अदा करावयाच्या रकमेचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **वर्ष** | **प्रदानाची रक्कम** | **जीएसटी १८%** | **एकूण** |
| १ | प्रथम वर्ष | ६,३००/- | १,१३४/- | ७,४३४/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | द्वितीय वर्ष | ६,३००/- | १,१३४/- | ७,४३४/- |
| ३ | तृतीय वर्ष | ८,४००/- | १,५१२/- | ९,९१२/- |

३) मात्र ग्रामपंचायतीला उपरोक्त दरापेक्षा कमी दरामध्ये स्थानिक पातळीवरील सक्षम संस्थेकडून सदर काम करुन घ्यावयाचे असल्यास ग्रामपंचायतीने संबंधित संस्थेला परस्पर रक्कम अदा करावी.

४) जिल्हानिहाय प्राप्त ग्रामपंचायतींच्या यादीनुसार निवड करण्यात आलेल्या संस्थेला वेळोवेळी शासन स्तरावर कार्यादेश (वर्क ऑर्डर) देण्यात येतील. मात्र एका वेळी सदर कार्यादेश देतांना जिल्ह्यातील एकूण ग्रामपंचायतींच्या १० % किंवा १०० यापैकी जे कमी असेल तितकी संख्या असणे अपेक्षित असुन या पेक्षा कमी असल्यास शासनाद्वारे निर्धारित संस्था कार्यादेश देणेबाबत शासनास विनंती करू शकेल.

५) कार्यादेश (वर्क ऑर्डर) प्राप्त झाल्यानंतर आठ आठवडयांच्या आत ग्रामपंचायतीच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांमध्ये ISO ९००१ : २०१५ प्रमाणीकरणाबाबत संबंधित प्रशिक्षण व माहिती करण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात येईल. Change management तसेच ISO प्राप्त करून घेण्यासाठी ग्रामपंचायतीस पाठबळ व मार्गदर्शन (Handhold) करून सक्षम बनविण्यात येईल तसेच या ग्रामपंचायतीला भेट देऊन त्यांना या प्रक्रियेसाठी लागणाऱ्या सेवा पुरविण्यात येतील.

६) प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर व QMS आधारित सर्व ग्रामपंचायतीची प्रक्रिया ( registers व processes इ.) राबविल्यानंतर केंद्र शासनाच्या पॅनलवर असलेल्या संस्थेकडून ISO प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची कार्यवाही संबंधित ग्रामपंचायतीने करावी.

७) ISO प्रमाणपत्र देणाऱ्या संस्थेने कार्यपद्धतीमध्ये काही उणीवा (Gaps) निदर्शनास आणून दिल्यास त्यानुसार तीन आठवडयांच्या आत आवश्यक त्या सुधारणा करून देणे निवड करण्यात आलेल्या निवीदा धारक संस्थेस बंधनकारक राहील.

**टप्पा-३- देखभाल/ देखरेख सेवा**

१) ग्रामपंचायतीने ISO ९००१ : २०१५ प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर प्रमाणपत्र देणाऱ्या केंद्र शासनाच्या पॅनलवर असलेल्या संस्थेकडून परिक्षण (Surveillance Audit) करण्यापूर्वी तीन महिन्या अगोदर आंतर्गत परिक्षण करण्यात येईल. सदर कार्यवाही निवड करण्यात आलेल्या संस्थेकडून पुढील तीन वर्षांसाठी दर वर्षी करण्यात येईल. ज्या

ग्रामपंचायतींनी स्थानिक पातळीवर आयएसओ प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याचा पर्याय स्विकारला असेल त्यांनी सदर कार्यवाही संबधित संस्थेकडून पूर्ण करुन घ्यावी.

२) Surveillance Audit मध्ये सुचविण्यात आलेल्या सुधारणांनुसार (Gaps) निवड करण्यात आलेल्या संस्थेने ग्रामपंचायतीमध्ये आवश्यक प्रशिक्षण आणि दस्तावेजीकरण करणे बंधनकारक राहिल.

४. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी निवड करण्यात आलेली एजन्सीने संगणक प्रणाली तयार करावी. त्याची कार्यपद्धती पुढील प्रमाणे राहिल.

i. ग्रामपंचायतींचे आयएसओ प्रमाणिकरण करण्यासाठी शासन स्तरावर मान्य झालेल्या गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली दस्तावेज (QMS - Quality Management System Document) नुसार आवश्यक ते बदल करणे व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणाकरिता संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवक यांनी त्यांच्या लॉगइनमध्ये शासनाकडे नोंदणी करावी. त्यामध्ये सदरचे काम शासन स्तरावर निविदा प्रक्रियेद्वारे निश्चित झालेल्या सल्लागार संस्थेकडून करावे किंवा स्थानिक पातळीवरील दर्जेदार संस्थेकडून करुन घ्यावे याबाबतचा पर्याय निवडावा.

ii. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे यांच्या लॉगइनमध्ये जिल्हा निहाय एकूण ग्रामपंचायतींच्या १०% किंवा १०० या पैकी जे कमी असेल तितकी संख्या प्राप्त झाल्यानंतर संगणक प्रणालीकडून कार्यारंभादेश (Work Order) तयार होईल. मात्र यापेक्षा कमी संख्येसाठी कार्यादेश देणेबाबत निवड करण्यात आलेल्या संस्थेने विनंती केल्यास राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे हे कार्यादेश देतील.

iii. निवड करण्यात आलेल्या संस्थेला राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे यांच्या स्तरावर कार्यारंभादेश (Work Order) देण्यात येतील.

iv. कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर या शासन निर्णयात नमुद करण्यात आलेल्या विविध कामाच्या टप्प्यानुसार काम पुर्ण झाल्यानंतर संगणक प्रणालीवर त्या-त्या टप्प्याचे देयक (Invoice) तयार होवून ग्रामसेवक यांच्या लॉगीनमध्ये पाठवेल.

v. ग्रामसेवक सदर देयकाची पुष्ठी प्रणालीवर करेल व संबंधीत काम पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र अपलोड करेल. देयकाची पुष्ठी झाल्यानंतर सदर देयक राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान यांच्या लॉगइनमध्ये प्राप्त होईल.

vi. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे हे या प्रणालीमध्ये Aggregator असून त्यांच्या लॉगइनमध्ये देयक प्राप्त झाल्यानंतर एकत्रित देयकांची नोटिफीकेशन प्रणालीद्वारे तयार होऊन त्याआधारे संस्थेस रक्कम अदा करण्यात येईल.

vii. ISO प्रमाणीकरणाबाबतची सर्व प्रक्रीया पूर्ण होऊन ग्रामपंचायत ISO प्रमाणीकरण संस्थेकडून ISO - ९००१: २०१५ प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर ग्रामसेवक त्यांच्या लॉगइनमध्ये सदर प्रमाणपत्र अपलोड करेल व त्याबाबतची पुष्ठी संगणक प्रणालीवर करेल.

viii. अशाप्रकारे ISO - ९००१ : २०१५ प्रमाणपत्र पुष्ठी केलेल्या सर्व ग्रामपंचायतींचे उर्वरित रकमेचे देयक राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे यांच्या लॉगइन मध्ये प्राप्त होइल. एकत्रित देयकांची नोटिफीकेशन प्रणालीद्वारे तयार होऊन त्याआधारे संस्थेस रक्कम अदा करण्यात येईल.

ix. सदर कामाचे विविध अहवाल शासन स्तरावरील लॉगीनमध्ये देण्यात येतील.

**५.** निविदा धारक संस्थेला रक्कम अदा करणे

१) **BPR साठी रक्कम अदा करणे-**

| **अ.क्र.** | **सेवांचा तपशील** | **प्रदानाची टक्केवारी (प्रो-राटा बेसिस)** |
|---|---|---|
| १ | Understanding about current processes and submission of AS IS document | ५% |
| २ | Suggesting BPR for processes and submission of TO BE document | ५% |
| ३ | QMS (Quality Management System) Document तयार करणे | १०% |
| ४ | Submission of mapping of processes against ISO standard and training | १०% |
| ५ | QMS डॉक्यूमेंट/ process design, mapping of processes against ISO standard व प्रशिक्षण साहित्य इ. साठी समितीची मान्यता | ५०% |
| ६ | शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर | २०% |

वरीलप्रमाणे BPR साठी एकुण रू.१.४५ कोटी अधिक १८% जीएसटी एकूण रू. १.७१ कोटी इतका खर्च येणार असून सदर खर्च राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे यांचेकडील खात्यात १३ व्या वित्त आयोगातील शिल्लक असलेल्या रकमेतुन भागविण्यात यावा.

२) ग्रामपंचायतींचे आयएसओ प्रमाणिकरण करण्यासाठी देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाकरिताच्या प्रदानाचे टप्पे पुढीलप्रमाणे आहेत-

| अ.क्र | सेवांचा तपशील | प्रदानाची टक्केवारी (प्रो-राटा बेसिस) |
|---|---|---|
| १ | ISO९००१:२०१५ - जागृतता आणि गुणवत्ता व्यवस्थापनाची तत्वे : याबाबत प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन | २०% |
| २ | ग्रामपंचायतीला ISO ९००१ : २०१५ प्रमाणिकरणासाठी आवश्यक असणारी सर्व कामे पूर्ण करणे | २०% |
| ३ | प्रमाणिकरणापूर्वीचे परिक्षण (Pre-Certification Audit) | २०% |
| ४ | ISO९००१:२०१५ certification of sites | ४०% |

३) प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर केंद्र शासनाच्या पॅनलवरील संस्थेकडून ISO प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची कार्यवाही संबंधित ग्रामपंचायतीने करावी. ISO प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर वरील प्रमाणे उर्वरित ४० % रक्कम एजन्सीला अदा करण्यात येईल. केंद्र शासनाच्या पॅनलवरील संस्थेकडून ISO प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठीचा खर्च ग्रामपंचायतीने स्वनिधीतून परस्पर करावा.

४) ग्रामपंचायतींनी ISO प्रमाणपत्र प्राप्त करून घेतल्यानंतर पुढील तीन वर्ष देखभाल सेवेसाठी खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार रक्कम प्रदान करण्यात यावी.

| अ.क्र | सेवांचा तपशील | प्रदानाची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | प्रमाणिकरणानंतर एका वर्षात वार्षिक परिक्षण तसेच Pre surveillance परिक्षण पूर्ण करणे | ३०% |
| २ | प्रमाणिकरणानंतर दुसऱ्या वर्षात वार्षिक परिक्षण | ३०% |

| | | |
|---|---|---|
| | तसेच Pre surveillance परिक्षण पूर्ण करणे | |
| ३ | प्रमाणिकरणानंतर तिसऱ्या वर्षात वार्षिक परिक्षण पूर्ण करणे | ४०% |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८२०४८१०७५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Aseem Surendrakumar Gupta

Digitally signed by Aseem Surendrakumar Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Developement Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c915867 8b, cn=Aseem Surendrakumar Gupta
Date: 2019.09.19 19:22:08 +05'30'

**( असीम गुप्ता )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
३. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे
४. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद (सर्व)
५. गट विकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व)
६. ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत (सर्व)
७. सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
८. निवडनस्ती (आपले सरकार कक्ष)

प्रत माहितीसाठी,

१. मा.मंत्री (ग्रामविकास), यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास), यांचे खाजगी सचिव
३. मा.प्रधान सचिव (ग्रामविकास विभाग) यांचे स्वीय सहायक